**ध्वनी प्रदूषण नियम २००० व अनधिकृत मंडप उभारण्या संदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः न्यायाप्र २०१६/प्र.क्र.१२७/नवि-१७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: १९ नोव्हेंबर, २०१६

**प्रस्तावना:-**

ध्वनी प्रदुषण नियम २००० व रस्त्यावर / पदपथावर / पादचारी मार्गावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप वा तत्सम रचना उभारण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन दाखल करण्यात आलेली आहे. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान मा. न्यायालयाने दि.१०, ११, १२ व १६ ऑगस्ट २०१६ रोजी दिलेल्या विस्तृत निकालाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीच्या सूचना देणे विचाराधीन होते.

**परिपत्रक:-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन प्रकरणी मा. न्यायालयाने दि.१०, ११, १२ व १६ ऑगस्ट २०१६ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्यावी.

ध्वनी प्रदूषण नियम २००० च्या अनुपालना संदर्भात व अनधिकृत मंडप वा तत्सम रचना उभारण्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने खालील सूचना विचारात घ्याव्यात

१) ध्वनी प्रदूषण नियम २००० मधील नियम ७ नुसार नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात ध्वनी प्रदूषण नियमांच्या उल्लंघनाच्या तक्रारीसंदर्भात तक्रार निवारण यंत्रणा सुरु करण्यात यावी. अनुज्ञप्ती विषयक संस्थांनी ध्वनीप्रदूषण नियमांच्या उल्लंघनाबाबत प्रत्येक तक्रारीची, निनावी तक्रारीची देखील दखल घ्यावी. प्रचलित/ पारंपारिक पध्दती शिवाय महानगरपालिकांनी व नगरपालिकांनी टोल फ्री क्रमांकही ध्वनीप्रदूषण तक्रारी स्वीकारण्या करिता उपलब्ध करुन दयावा. ई-मेल, लघुसंदेश व व्हॉटसअॅप व्दारे देखील तक्रारी दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन दयावी. तक्रार वही तयार करुन तक्रारदारास तक्रार क्रमांक उपलब्ध करुन दयावा. तक्रार नोंदवहीत केलेल्या कार्यवाहीची माहिती नमूद करावी. तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाहीची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या /महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करावी.

२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या तरतुदी अंतर्गत ध्वनीप्रदुषण नियंत्रणाकरीता पोलीस अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्याबाबत गृह विभागाने दि. १४.०७.२०१५ रोजी अधिसूचना प्रसिध्द केलेली आहे. या अधिसूचनेची प्रत दि. २६.०९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये अग्रेषित केलेली आहे.

ध्वनीप्रदुषणाकरिता तक्रारींसाठी नियुक्त यंत्रणेचे नाव, दूरध्वनी क्रमांक इ. माहिती स्थानिक पोलीस कार्यालयाकडून प्राप्त करून स्थानिक वृत्तपत्रे, स्थानिक दूरचित्रवाहिन्या, जिल्हाधिकारी व महानगरपालिका/ नगरपालिका यांच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करावी. सदर माहिती प्रभाग कार्यालयाच्या सूचना फलकावर देखील प्रदर्शित करावी.

३) गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी इ. सणांपूर्वी जिल्हाधिकारी, आयुक्त, महानगरपालिका यांनी उत्सव साजरे करणाऱ्या महत्वाच्या संघटनांची बैठक घेऊन ध्वनीप्रदूषण कायदेविषयक आणि पदपथावर

तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारण्याबाबतच्या नियमांची माहिती व कायदेशिर तरतूदींच्या भंगाचे परिणाम या बाबतची माहिती दयावी. आवश्यकते नुसार स्थानिक राजकीय नेते, मोहल्ला समित्यांचे सदस्य यांना देखील बैठकीसाठी बोलविण्यात यावे. रस्त्यावर, पदपथावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारण्याबाबतच्या व ध्वनीप्रदूषण विषयक नियमांची पालन करण्याबाबत संबंधितांना या बैठकीत सूचना दयाव्यात.

४) ध्वनीप्रदूषण नियमांचे सक्त पालन होईल याबाबत महानगरपालिका व नगरपालिका यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

५) रस्त्यावर, पदपथावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारणे बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करावे.

६) रस्त्यावर / पदपथावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप वा तत्सम रचना उभारण्यासाठी मुंबई महानगर पालिका कायदा, १८८८ कलम ३१७ वा महाराष्ट्र महानगर पालिका कायदा १९४९ कलम २३४ नुसार परवानगी देते वेळी परवानगी पत्राची प्रत दर्शनी भागात प्रदर्शित करण्याची अट समाविष्ट करण्यात यावी व अशी कार्यवाही झाली नसल्याच्या ठिकाणी अशा रचना तातडीने निष्कासित कराव्यात.

उचित पूर्वपरवानगी शिवाय उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या स्वरुपातील मंडप, कमानी व तत्सम रचना तातडीने निष्कासित करण्याची कार्यवाही म.न.पा.आयुक्तांनी करावी. धार्मिक कार्यक्रमांपूर्वी देखील वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

७) महानगरपालिका क्षेत्रात तहसिलदार दर्जापेक्षा कनिष्ठ नसलेल्या अधिकाऱ्यांचे पथक जिल्हाधिकारी यांनी तयार करावे. मोठया धार्मिक सणांच्या सात दिवस अगोदर महानगरपालिका क्षेत्रात संबंधित ठिकाणी सदर पथकातील सदस्य नियमितपणे भेटी देतील व महानगरपालिका आयुक्त यांच्या परवानगी शिवाय तात्पुऱ्या स्वरुपात मंडप व तत्सम रचना उभारण्यात येत नसल्याची खातरजमा करतील. परवानगी पत्र व त्यासंदर्भातील तपशील प्रदर्शीत न करणारी रचना / मंडप बेकायदेशीर राहील. या पथकाने परवानगी पत्रातील अटींच्या उल्लंघनाबाबत वा पूर्वपरवानगी शिवाय तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारण्यात येत असल्याची बाब संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्या निदर्शनास आणावी. या पथकाकडून मिळालेल्या माहिती आधारे अशी कामे निष्कासित करण्याची कारवाई महानगरपालिकेच्या यंत्रणेने करावी .महानगरपालिका देखील महसूल अधिकाऱ्यांच्या वरील पथकाप्रमाणे पथक गठीत करुन कार्यवाही करु शकेल.

मा.न्यायालयाच्या वरील सूचना विचारात घेता संबंधित महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी परस्पर समन्वय राखून सदर पथके गठित करण्याबाबत कार्यवाही करतील

८) मुंबई महानगर पालिका कायदा, १८८८ वा महाराष्ट्र महानगर पालिका कायदा १९४९ नुसार तात्पुरत्या स्वरुपात रस्त्यावर / पदपथावर रचना उभारण्यासाठी परवानगी देताना वाजवीरित्या पदपथ, रस्ते, पादचारी मार्ग नागरिकांना अडथळाविरहित राहतील याची खबरदारी घेऊन संविधानाच्या कलम २१ नुसार विहित नागरीकांच्या मुलभूत हक्कांना बाधा येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

९) ध्वनी प्रदूषण नियमांच्या तक्रारींची दखल घेण्याकरिता ज्या स्वरुपाची तक्रार निवारण यंत्रणा राहील त्याच स्वरुपात तात्पुरत्या स्वरुपात रस्त्यावर / पदपथावर रचना उभारण्या संदर्भात तक्रार निवारण यंत्रणेची निर्मिती करावी.तक्रारींची दखल घेण्याकरिता प्रभाग निहाय अधिका-यांची नियुक्ती करण्यात यावी.

१०) सदर आदेश व यापूर्वीचे आदेश सर्व जाती धर्माच्या उत्सवांना व प्रार्थना स्थळांना लागू राहतील.

११) ध्वनी प्रदुषण नियमांच्या पालनासाठी व अनधिकृत मंडप / रचनांबाबत कार्यवाही करतेवेळी आवश्यकतेनुसार स्थानिक पोलीसांची मदत घ्यावी.

१२) प्रत्येक महत्वाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांपूर्वी राज्य शासनाने व महानगरपालिकांनी ध्वनी प्रदूषण व अनधिकृत मंडप याबाबतच्या तक्रार निवारण यंत्रणेविषयी पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी दयावी. सदरहू प्रसिध्दी आघाडीच्या वृत्त पत्रात व दूरचित्र वाहीन्यांमार्फत दयावी. प्रभाग कार्यालयांमध्ये, विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी, तहसिलदार कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालयात या बाबत सूचना देणारी पत्रके प्रदर्शित करावीत.

१३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायदा १९६६ नियम ३ मधिल उपनियम ४ नुसार विकास आराखडा तयार करताना नियोजन प्राधिकरणाने व स्थानिक स्वराज्य संस्थेंने ध्वनी प्रदूषण विषयक विहित पातळी राखली जाईल व ध्वनी प्रदुषण विषयक तरतूदींचे कटाक्षाने पालन होईल याकडे लक्ष दयावे. ध्वनीप्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम २००० मधील नियम ३ च्या उपनियम ४ चे पालन करण्याबाबत प्रादेशिक आराखडा व विकास आराखडा तयार करताना आवश्यक कार्यवाही करावी.

१४) हेलिपॅड तयार करण्यासाठी परवानगी विषयक अर्जावर विचार करतांना प्रस्तावित हेलिपॅडच्या ठिकाणी संभाव्य ध्वनीप्रदूषणाची पातळी विचारात घ्यावी.

१५) ध्वनी प्रदूषण नियम २००० मधील नियम ५ उपनियम १ नुसार पूर्वपरवानगी शिवाय ध्वनीक्षेपक यंत्रणा वापरण्यात येणार नाही, जाहिरात फलक, फ्लेक्स, तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणाऱ्या मंडप व तत्सम रचना जवळ वा त्या ठिकाणी पूर्वपरवानगी शिवाय लावण्यात येऊ नयेत, रस्त्यावर व पादचारी मार्गावर खोदण्यात येऊ नयेत, या अटी तात्पुरत्या स्वरुपात मंडप व तत्सम रचना उभारण्यासाठी परवानगी देते वेळी स्पष्टपणे परवानगी पत्रात नमूद करण्यात याव्यात. ध्वनीप्रदूषण नियमामधील परिशिष्टात नमूद ध्वनी प्रदूषण विषयक विहित मर्यादा पातळीचे निकष वेळेसह परवानगी पत्रात नमूद करुन त्याच्या पालनाची अट समाविष्ट करावी.

१६) वरील सूचना नुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी महानगर पालिका क्षेत्रात संबंधित आयुक्त व नगर पालिका क्षेत्रासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहिल.

१७) प्रस्तुत प्रकरणी मा.न्यायालयास कार्यपूर्तता अहवाल सादर करावयाचा आहे. वरील सूचना तातडीने विचारात घेऊन आवश्यक कार्यवाही विना विलंब करण्यात यावी. त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६११२११५४४९३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.11.21 12:00:25 +05'30'

**(ज.ना. पाटील)**

सह सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. विभागीय आयुक्त सर्व
३. आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण, मुंबई.
४. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्या.
५. आयुक्त, सर्व महानगरपालिका
६. आयुक्त, पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण, पुणे
७. जिल्हाधिकारी, सर्व
८. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
९. अवर सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई
१०. अवर सचिव, गृह विभाग,मंत्रालय, मुंबई.
११. अवर सचिव, पर्यावरण विभाग,मंत्रालय, मुंबई
१२. कक्ष अधिकारी, (नवि-११,१८,१९,२१,२२,२३,२४,२५,२६,२८) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.